## 000 प्र क र ण - प हि ले 000

### संशोधन पध्दती

१·१ समस्येची मांडणी व नमुना निवड

१·२ समस्येची मांडणी

१·३ अभ्यासाची उद्दिष्टे

१·४ संशोधनाचा आराखडा

१·५ तथ्य संकलन

000

## *** प्र क र ण - प हि ले ***

## संशोधन - पध्दती

### १.१ : समस्येची मांडणी आणि नमुना निवड :

जगातील जवळ जवळ सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात बेकारी व दारिद्र्य आढळून येते. त्यामुळे आपणास असे म्हणता येईल की, जगातील बहुसंख्य देशात बेकारीचा व दारिद्र्याचा दुर कमी अधिक प्रमाणात सापडतो. परंतु भारतात बेकारीचा व दारिद्र्याचा दुरच सापडत नाही. तर बेकारीचा व दारिद्र्याचा भस्मासुर थैमान घालीत आहे. आज भारतात जवळ जवळ ६ कोटी पेक्षा अधिक लोक, बेकार, अर्धबेकार आहेत. एवढेच नव्हे तर एकूण लोकसंख्यापैकी किमान ३० टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत.

भारतातील बेकारी व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी भारत सरकारने अनेक उपायाची अंमलबजावणी केलेली आहे. भारतातील ग्रामीण भागातील व नागरी भागातील दारिद्र्य व बेकारी दूर करण्यासाठी अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या भागासाठी योजना राबविल्या आहेत. ग्रामीण भागासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना राबविली आहे. तर शहरी भागासाठी किंवा नागरी भागासाठी स्वयं रोजगार योजना राबविल्या आहेत.

सांगली जिल्ह्यामध्ये सांगली शहर त्याच प्रमाणे मिरज, तासगांव, विटा, इस्लामपूर, आष्टा या शहराचा समावेश नागरी भागात केला जातो. नागरी भागातील वाढत्या दारिद्र्याची व बेकारीची समस्या दूर करण्यासाठीच भारत सरकारने "नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना" सप्टेंबर १९८६ सालापासून सुरू केली ही योजना राष्ट्रीयकृत

बँकामार्फत राबविली गेली. सांगली जिल्ह्यामध्ये सांगली, मिरज, तासगांव, विटा, इस्लामपूर, आष्टा, या नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना राष्ट्रीयकृत बँकानी राबविली आहे.

संशोधनाच्या अभ्यासासाठी सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राष्ट्रीयकृत बँकानी राबविलेली स्वयं रोजगार योजनेची निवड केली आहे.

सांगली जिल्ह्यातील नागरी भागात १९९१-९२ या आर्थिक वर्षात ३१६ लोकाना या योजनेखाली राष्ट्रीयकृत बँकानी कर्ज पुरवठा केलेला आहे. त्यापैकी १७५ लोक (लाभार्थी) हे सांगली शहरातील आहेत. १७५ लोकापैकी ५० लोकांची (लाभार्थींची अभ्यासासाठी निवड केलेली आहे. या ५० लाभार्थींची निवड करताना सोयीनुसार व ज्या लोकांची प्रत्यक्ष माहिती उपलब्ध झालेली आहे. अशाच लोकांची निवड केलेली आहे. सर्वसाधारण पणे सांगली शहरात सर्व राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखानी १७५ लोकाना या योजनेखाली कर्जपुरवठा केलेला आहे. त्यापैकी १/३ लोकांची प्रत्यक्ष माहिती अभ्यासासाठी घेतलेली आहे.

१.२ : <u>समस्येची मांडणी :</u>

१) नागरी भागातील दारिद्र्य व बेकारीत जब जीवनमान जगणा-या लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी व त्यांना स्वयं: रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी त्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी केन्द्र सरकार पुरस्कृत योजना राष्ट्रीयकृत बँकांमार्फत राबविली गेली आहे.

२) सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं: रोजगार योजना सप्टेंबर १९८६ सालापासून राबविली गेली आहे.

३) सांगली जिल्ह्यात ही योजना सांगली, मिरज, तासगांव, विटा, इस्लामपूर व आष्टा या नागरी भागात फक्त राष्ट्रीयकृत बँकामार्फत राबविली गेली आहे.

४) या योजनेच्दारे फक्त नागरी भागातील गरीब लोकांच्यात स्वयं: रोजगारासाठी राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्ज पुरवठा केला जातो. त्याचा लाभ घेतलेल्या लाभार्थींना कोणत्या प्रकारचे लाभ मिळाले व त्यामधील समस्या कोणत्या आहेत त्यांचा अभ्यास करणे.

१.३ : <u>अभ्यासाची उद्दिष्टे</u> :

१) नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी असणा-या स्वयं: रोजगार योजनेची ओळख करुन घेणे व योजनेच्या कार्यपध्दतीचे अवलोकन व समीक्षण करणे इ.

२) सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी राबविलेल्या स्वयं: रोजगार योजनेचा १९९१-९२ स्थितीचा अभ्यास करणे.

३) ही योजना नागरी भागात यशस्वी झाली की अयशस्वी झाली ते पाहणे.

४) ही योजना जिल्ह्यातील नागरी भागात यशस्वी किंवा अयशस्वी झाली त्यांची कारणे अभ्यासणे.

५) या योजनेचा प्रत्यक्षात लाभधारकांना काय फायदा झाला ते अभ्यासणे.

६) ही योजना यशस्वी होण्यासाठी किंवा चालु राहण्यासाठी काही सुधारणा सुचविणे.

१·४ : संशोधनाचा आराखडा :

या संशोधन अहवाला मध्ये राष्ट्रीयकृत बँकामार्फत सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राबविली गेलेल्या स्वयं: रोजगार योजने बाबतचा अभ्यास केलेला आहे· प्रारंभी भारतातील वाढती लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येतून निर्माण होणारी बेकारी व दारिद्र्याची समस्या व या समस्येवर शासनाने केलेल्या उपायाचा अभ्यास केलेला आहे· त्याच बरोबर सांगली जिल्ह्याचा परिचय करुन करुन घेऊन जिल्ह्यात ग्रामीण भागात व नागरी भागात विकासासाठी राबविलेल्या शासकीय योजनेचा अभ्यास करुन सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी राबविलेल्या स्वयं: रोजगार योजनेचा मुद्देसुद अभ्यास केलेला आहे· हा अभ्यास करीत असताना प्राथमिक साधन सामग्रीचा व दुय्यम साधन सामग्रीचा वापर केलेला आहे व त्याचे पृथ्थकरण केलेली आहे· या अभ्यासात ज्या लाभधारकाना बँकाकडून स्वयं: रोजगारासाठी कर्जपुरवठा झालेला आहे· त्यांच्यापाशी प्रश्नावली स्वरुपात मुलाखती घेऊन चर्चा केलेली आहे· त्याच प्रमाणे सांगली जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया या बँकेकडील जिल्हा पत योजना मधून व जिल्ह्यातील नागरी भागातील इतर राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखांतून योजने संदर्भात माहिती मिळवून स्वयं: रोजगार योजनेचा अभ्यास केलेला आहे·

१·५ : तथ्य संकलन :

या प्रबंधातील संपूर्ण अभ्यास हा प्राथमिक साधन सामग्री व दुय्यम साधन सामग्रीवरती अवलंबून आहे· मी जो प्रामुख्याने अनेक पध्दतीने गोळा केलेला आहे· प्राथमिक साधन सामग्री मध्ये प्रामुख्याने ज्या लाभधारकाना राष्ट्रीयकृत बँकाकडून या योजने अंतर्गत स्वयं:

रोजगारा साठी कर्ज पुरवठा झालेला आहे. त्या मधील काही लाभ धारकांची अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

दुय्यम साधन सामग्री ही सांगली जिल्ह्यांची की अग्रणी बँक. बँक ऑफ इंडिया आहे या बँके मधुन घेतलेली आहे. त्याच बरोबर राष्ट्रीयकृत बँकांच्या इतर शाखामधुन योजने संदर्भात उपलब्ध असलेली माहिती घेतलेली आहे.

त्या प्रबंधात अभ्यासासाठी १९९१-९२ या आर्थिक वर्षात "नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना" या योजने अंतर्गत राष्ट्रीय कृत बँकांनी जो कर्ज पुरवठा केलेला आहे त्या बाबतचा तपशील अभ्यासलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अग्रणी बँकेची वार्षिक जिल्हा पत योजना व त्याबाबतचा वार्षिक अहवाल याचा प्रामुख्याने अधिक उपयोग केलेला आहे. त्याच बरोबर अग्रणी बँकेच्या इतर कार्यालयीन दप्तरांच्या आधारे व राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखेच्या कार्यालयीन दप्तरांच्या आधारे महत्वाचे म्हणजे अनेक बँक अधिका-याशी चर्चा करुन व योजनेचा लाभ घेणा-या लोकांच्या कडुन प्रश्नावली स्वरुपात मुलाखती घेऊन चर्चा करण्यात आली.

या विषया संबंधित माहिती प्रामुख्याने भारती विद्यापीठाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील व चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली यांच्या ग्रंथालयातील पुस्तके नियतकालिके यातुन मिळविली आहे.

या प्रबंधात केवळ सारणीकरण, प्रमाण, या सारख्या साध्या सोप्या शास्त्रीय तंत्राचा वापर केलेला आहे.

दुस-या प्रकरणात भारतातील वाढती लोकसंख्या, बेकारी व दारिद्र्य व त्यावरील शासनाने राबविलेल्या कार्यक्रमाची माहिती

दिली आहे.

तिस-या प्रकरणात सांगली जिल्ह्याचा परिचय करुन घेतलेला आहे व जिल्ह्यात ग्रामीण भागाच्या व शहरी भागाच्या विकासासाठी शासनाने राबविलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली आहे.

चौथ्या प्रकरणात सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राष्ट्रीयकृत बँकानी राबविलेल्या स्वयं: रोजगार योजनेचा तपशील पाहिलेला आहे.

प्रकरण पाचव्या मध्ये निष्कर्ष आणि समारोप मांडलेला आहे.

000000